# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, ३०२३३४४२/४३ फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : dtedesk2@gmail.com Internet : http://www.dtemaharashta.gov.in


क्रमांक : २/एनजीसी/बी.फार्म. /मान्यता/२०१९/ 646

दिनांक : 28 JUN 2019

प्रति,
प्राचार्य,
तिर्थंकर एज्युकेशन सोसायटीचे
डॉ.शिवाजीराव कदम कॉलेज ऑफ
फार्मसी(डीग्री),मु.पो.कसबे दिग्रज
बागानवत, सांगली ४१६ ३०५

(डीटीई कोड ६८९०)

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून कायम विना-अनुदान तत्त्वावरील विद्यमान संस्थेत सुरु असलेल्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्याबाबत.

संदर्भ :१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र. वेस्टर्न/१-४२५९३१६५७६/२०१९/ ईओए, दि. २९ एप्रिल, २०१९.

२. शासन निर्णय क्र. टीईएम-२०१९/प्र.क्र.१३०/तांशि-४, दि. १० जून, २०१९

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून सुरु असलेल्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत खालीलप्रमाणे विहित अटींच्या अधिन राहून वाढ करण्यास परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | बी.फार्मसी | ५०-१०० |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र "अ" व "ब" या संचालनालयास सादर केलेले आहे. आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास नियतठेव म्हणून रु. १.५० लाख पावती क्र. २२६०९६ दि. १८.६.२०१९ अन्वये युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा - सिव्हिल हॉस्पिटल सांगली, येथे संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून कायम विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे विद्यमान औषधनिर्माणशास्त्र संस्थेमधील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.
२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेतांक क्रमाक व पासवर्डद्वारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.
३ प्रस्तुत मान्यता ही संबंधित अभ्यासक्रमांना विद्यापीठाच्या संलग्नतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे. सबब आपल्या संस्थेतील अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यापूर्वी संबंधित विद्यापीठाची संलग्नता प्राप्त करणे अनिवार्य असून, विद्यापीठाच्या संलग्नतेशिवाय संस्थेमध्ये कोणतेही प्रवेश करण्यात येऊ नयेत.
४. संस्थेने प्रवेशासाठी संबंधीत संस्थांची व अभ्यासक्रमांची प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.
५. शासनाने, या संचालनालयाने, संबंधित विद्यापीठाने व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तींचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांना राहतील..

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे आपणास बंधनकारक राहील.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- मा. सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, ९वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई- ४००००१

त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत संस्थेने आपल्या कार्यालयाकडे नोंदणी केल्याशिवाय व प्रस्तुत अभ्यासक्रमांस विद्यापीठाची संलग्नता असल्याशिवाय प्रवेश करण्यात येऊ नयेत.

२. मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
४. कार्यासन क्र. कार्यासन क्र.२अ मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कार्यासन क्र.३, (आय.टी.सेल) मुख्य कार्यालय, मुंबई
६. निवड नस्तीस.